भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ८४९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/१२/२०१६

**१) घरातील सोन्याचे दागीने व नगदी पैश्याची चोरी . :–**

दिनांक २२/१२/२०१६ रोजी ते २७/१२/२०१६ रोजी १३.३० वा. दर. यातील संशयीत आरोपीने फिर्यादीचे घरी सुनामौका पाहुन खुल्या दारातुन घरात प्रवेश करुन घरातील जर्मन डब्यात ठेवलेली १ सोन्याची पांचाली वजन ५ ग्रॅम, सोन्याची लेडीज अंगठी वजन ४ ग्रॅम, १ जोड सोन्याचे कानाचे रिंग वजन ४ ग्रॅम, सोन्याचे कर्णफुल वजन ४ ग्रॅम व नगदी १,०००/–रु. असा एकुण ३५,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी कुंडलिक जयदेव माथुरकर वय ३३ वर्ष, रा. मांगली यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावने पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) घरातील सोन्याचे दागीने व नगदी पैश्याची चोरी करण्याचा संशय व्यक्त केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २८+२९/१२/२०१६ रोजी १९.०० ते ०२.१५ वा. दर. यातील फिर्यादी अल्ताफ लबजुला हुसेन वय ४२ वर्ष, रा. बाबा नगर तकीया वार्ड भंडारा हे घराला ताला लावुन परीवारा सोबत नागपुर येथे कार्यक्रमाला गेले असता रात्री ०२.१५ वा. दरम्यान घरी परत आले त्या वेळी घराचे समोरील दाराचा ताला, कोंडा तुटलेला दिसला. घरात जावुन पाहीले असता घरातील सामान अस्तव्यस्त पडलेला दिसल्याने घरातील गोदरेज आलमारी मध्ये ठेवलेली १ सोण्याची अंगठी ५ ग्रॅम, ४ सोण्याची अंगठी प्रत्येकी ३ ग्रॅम, सोण्याचे ३ जोड, काणातील बारी वजन १० ग्रॅम, सोण्याची काळी पोत १० ग्रॅम, सोण्याची काळी पोत ५ ग्रॅम नगदी व २०,०००/–रु. असा एकुण ९८,०००/–रु. चा माल यातील संशयीत आरोपीने चोरुन नेले आहे. असा संशय व्यक्त केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५७,३८०,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. फटींग पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) अल्पवयीन मुलगा पैसे घेवुन घरुन निघुन गेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २९/१२/२०१६ रोजी १८.३० वा. दर. यातील फिर्यादीची अल्पवयीन पुतण्या हा घरी कुणालाही न सांगता अंदाजे १६,०००/–रु. घेवुन कुठेतरी निघुन गेल्याने त्यास कुणीतरी अज्ञात आरोपीने फुस लावुन पळवुन नेल्याचा संशय दर्शविल्याने फिर्यादी कैलास रामाजी केवट वय ३६ वर्ष, रा. आंनद मंगल कार्यालय जवळ रुक्मीनी नगर खात रोड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३६३ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील त्तपास सफौ. केवट पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) महीलेवर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद . :–**

माहे ऑगस्ट २०१६ ते आज पावेतो यातील आरोपीने फिर्यादी सोबत मैत्री पुर्वक संबध प्रस्थापीत करुन तिला लग्नाचे आमीष दाखवुन तिच्याशी रावनवाडी जंगलात नेवुन तिच्यावर अत्याचार केले त्यामुळे फिर्यादीस गर्भधारना झाली असता तिला थापड बुक्यांनी मारपीट करुन तिचे इच्छे विरुध्द गर्भपाताच्या गोळया देवुन तिचा गर्भपात घडवुन आणला तसेच हया प्रकरणाची माहीती कोणाकडे दिल्यास जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पो. स्टे भंडारा येथे अप क्र. ००/१६ कलम ३७६(एन),४१७,३१३,३१५,३२३,५०६ भादंवि चे कागदपत्र पोशी १४६ थेर पो. स्टे भंडारा यांनी पोस्टे ला आनुन पेश केल्याने पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३७६,३१३,३१५,३२३,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. शेख पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत

**५) अवैध दारू/ जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक २९/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. जवाहरनगर, व साकोली येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १३ लिटर हातभट्टी दारु कि. ६५०/–रू. तसेच जुगारातुन ५५४/–रु. असा एकुण किंमती १,२०४/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत संगणक कक्ष भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता